Dusty Sandals - Version 1.0

मार्ककृत सुवार्ता

*मार्ककृत सुवार्ता*

*मार्ककृत सुवार्ता*

# मार्ककृत सुवार्ता

## 1[1]

**1:1** शब्द "सुवार्ता" हे एका ग्रीक शब्दाचे भाषांतर आहे; ज्याचा अर्थ आहे 'उत्तम समाचार' देवाचा संदेश असल्यामुळे आणि त्याद्वारे मनुष्याला उद्धाराचा मार्ग सापडत असल्यामुळे येशू व त्यांच्या शिष्यांनी त्याला उत्तम समाचार असे म्हटले. 'येशू आणि ख्रिस्त' हया नांवाचा अर्थ पहा मत्त 1:1 हयांत. "देवाचे पुत्र" - मत्त 1:18; 3:16,17; योहान 1:18; 3:16; 5:15-23. **2,3**

**1:2,3** मला 3:2; यश 40:3; मत्त 3:3; 11:10. **4**

**1:4** मत्त 3:1-6; 9:5-7. **5-11**

**1:5-11** मत्त 3:4-17. **12,13**

**1:12,13** पहा, मत्त 4:1-11; लूक 4:1-13; "येशूंची परीक्षा" - हया थोडक्या माहितीद्वारे, मार्क आपल्याला एक सत्य सांगतो. हे सत्य इतर सुवार्तेत आढळत नाही – ते म्हणजे जंगली जनावरांची तेथे असलेली उपस्थिती. हयावरून कळते की येशू किती धोक्याच्या आणि एकांतात असलेल्या ठिकाणी होते. **14**

**1:14** मत्त 14:3. **15**

**1:15** मत्त 3:2; 4:17. **16-20**

**1:16-20** मत्त 4:18-22. **21**

**1:21** "कफर्णहूम" - मत्त 4:13. **22**

**1:22** मत्त 7:28,29. **23**

**1:23** "भूत/अशुद्ध आत्मा **24**

**1:24** दुष्ट आत्मा किंवा अशुद्ध आत्म्यांना हे ज्ञान होते की येशू आपल्या व्यक्तिमत्वात आणि सामर्थ्यात संपूर्णपणे किती अनन्यसाधारण होते. "देवपित्याचे पवित्रजण" - नवीन करारांत केवळ हयाच ठिकाणी हया शब्दांचा वापर झालेला आहे. परंतु सगळीकडे (प्रत्येक ठिकाणी) येशूंच्या संपूर्ण पवित्रतेवर भर दिलेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट पवित्रेचा उल्लेख प्रत्येक ठिकाणी केलेला आहे. पहा लूक 1:35; योहान 8:46; 2करिं 5:21; इब्री 4:15; 1 पेत्र 2:21-24. **25**

**1:25** येशूंठायी सर्व दुष्टात्म्यांवर, अशुद्ध आत्म्यांवर परिपूर्ण अधिकार होता आणि आजहि आहे. (5:1-10; लूक 10:17). **27**

**1:27** नवीन शिकवण लोकांना स्तंभित करीत नव्हती, पण केवळ हयासाठी ते आश्चर्य करीत होते की येशूंनी देवाच्या अलौकिक शक्तिमान कार्याद्वारे त्याचे प्रमाण दिले. देवाची प्रचंड शक्ती व बळ त्यांच्याठायी होते.

नोट्स - मत्त 8:1. 29-34

**1:29-34** मत्त 8:14-17. 34

**1:34** वचन 25; 3:12; 5:43; मत्त 8:4; 9:30; 12:16. 35

**1:35** येशू वारंवार प्रार्थना करीत होते. (मत्त 14:23; 19:13; 26:36,39; लूक 5:16; 6:12; 9:29; 22:32; योहान 17 अध्याय; इब्री 5:7). प्रार्थनेकरिता येशू एकांती जात असत. अशीच जागा ते शोधित असत. ज्याप्रमाणे एखादा मनुष्य देवाशी प्रार्थना करितो त्याचप्रमाणे येशूहि प्रार्थना करित असत. इतकेच केवळ नव्हे तर देवाच्या एकमेव - अनन्यसाधारण पुत्रासारखेहि ते देवाशी प्रार्थना करीत असत. म्हणजेच, त्यांचा दैविक (ईश्वरी) आणि मानवी स्वभाव (हे दोन्ही) त्यांच्या प्रार्थनेद्वारे प्रगट होत होते. तुलना योहान अध्याय - 17. 38

**1:38** पहा यश 61:1. अनेक कारणांपैकी हे एक कारण होते की येशू स्वर्गातून पृथ्वीवर आले. इतर कारणांसाठी पहा मत्त 5:17. 39

**1:39** मत्त 4:23. 40-43

**1:40-43** मत्त 8:1-4. 45

**1:45** हा कुष्ठरोगी बरा झाला होता. येशूंचे आभार मानून त्यांची आज्ञा पाळण्याऐवजी, येशूंनी सांगितलेल्या गोष्टी विरूद्ध त्याने कार्य केले. अशा प्रकारचे वर्तन करणारा हा काही शेवटचा मनुष्य नव्हता. लोकांचा समुदाय वाढत चालला होता, धार्मिक पुढाऱ्यांचा विरोध बळकट होत होता, तो इतका तीव्र विरोध होता की येशू तेथून निघाले; कारण यावेळी त्याठिकाणी दंगा/गडबड निर्माण करण्याची त्यांची इच्छा नव्हती. (पहा योहान 7:30)

## 2 1-12

**2:1-12** मत्त 9:1-8 चे नोट्स पहा. मार्क आपल्यासमोर किती आगळे चित्र मांडतो ते पहा. मार्काने दाखविले की लकवाग्रस्ताच्या मित्रांनी प्रत्येक अडचण व बाधा यांवर मात करण्याचा कसा दृढ निश्चय केला होता; हे त्यांच्या विश्वासावरून प्रगट होते. या गोष्टीत निश्चितच आपल्यापुढे एक उत्तम उदाहरणच ठेवलेले आहे. विश्वासाची चिकाटी व निरंतरता यासाठी पहा, मत्त 7:7,8; लूक 11:5-10; 18:1-8. 13,14

**2:13,14** पहा मत्त 9:9. याठिकाणी लेव्याला मत्तय असे म्हटलेले आहे. कदाचित लेवी हे त्याचे वास्तविक व मूळचे नांव होते, पण एका प्रेषिताच्या रूपांत त्याचे नवीन नांव मत्तय असे होते. इब्री भाषेत 'प्रभूंचे वरदान' याच शब्दाला ग्रीक भाषेत 'मत्तय' असे म्हणतात. (याहवे). 15-17

**2:15-17** मत्त 9:10-13. 18-22

**2:18-22** मत्त 9:14-17. 23-28

**2:23-28** मत्त 12:1-8. 27

**2:27** 'शब्बाथ' - निर्ग 20:8-11. प्रत्येक आठवडयावर केलेल्या परिश्रमापासून विश्रांती मिळावी यासाठी हा विशिष्ट दिवस नेमिलेला होता. त्याचप्रमाणे लोकांनी आपल्या निर्मात्याची आणि उद्धारकर्त्याची स्तुति आराधना त्या दिवशी करावी याकरिता शब्बाथाचे प्रयोजन केलेले होते. येशूंच्या काळातील अनेक धार्मिक पुढाऱ्यांनी शब्बाथाविषयीचे स्वतः तयार केलेले नियम लोकांसाठी केले होते. लोकांच्या गरजेपेक्षा अधिक प्रमाणात त्यांनी हे नियमच रूढ केले होते. मनुष्यप्राणी हा दिवस आणि अधिकृत नियम किंवा नियमबद्धतेहून अधिक महत्वाचा

मोलाचा आहे या गोष्टीवर येशूंनी आवर्जून भर दिला. तुलना कल 2:16. **28**

**2:28** "मी अर्थात मनुष्याचा पुत्र" - मत्त 8:20. 'प्रभु' - मत्त 12:8.

# **3**1-6

**3:1-6** मत्त 12:9-14. **5**

**3:5** जे, लोकांना धुळीत पायदळी तुडवून मानव निर्मित नियमांनी त्यांना दुखापत करण्याची इच्छा बाळगित होते, नव्हे तसे करीत होते, त्यांच्यावर येशू प्रचंड क्रोधाने भरून गेले आणि केवळ रागच नव्हे तर त्याविषयी त्यांना खूप दुःखहि झाले; हे असे लोक होते जे आपल्या ॅदयाच्या कठोरपणामुळे शब्बाथ दिवशी एखादयाला बरें करण्याची मनाई करीत होते, पण त्याच शब्बाथ दिवशी एखादयाला जिवें मारण्याचा कट करणे हे ते मान्य करीत होते. प्रियांनो आज देखील, अनेक धार्मिक लोकांठायी असलेली वागणूक, व्यवहार आणि कृत्यें हयाविषयी येशू निरंतर क्रोधिष्ट होतात; त्या गोष्टींचा अनेकदा राग बाळगतात. पाहा की, पाप आणि अन्यायाविरूद्ध व्यक्त केला जाणारा परमेश्वरीय क्रोध न्याय्य व योग्य आहे. **6**

**3:6** मत्त 12:14. "हेरोदीयन्स" - मत्त 22:16. **8**

**3:8** इदोम हा यहूदीयाच्या दक्षिण पश्चिमेकडचा प्रदेश होता. "सोर व सिदोन" - मत्त 11:21. **9**

**3:9** मत्त 13:2. **11,12**

**3:11,12** पहा 1:24,25,34. **13-19**

**3:13-19** नोट्स – मत्त 10:1-4. **17**

**3:17** 'गर्जन' - असे वाटते की त्यांचा स्वभाव, नैसर्गिक प्रवृत्ती आणि वागणुकीचा रीत किंवा कल काहीसा वादळी होता. तुलना लूक 9:54. **20**

**3:20** पहा 6:31. **21**

**3:21** "आप्त मित्र" - येथे जो ग्रीक शब्द उपयोगात आला आहे त्याचा अर्थ म्हणजे "जे त्यांच्याबरोबर आहेत" अर्थात जे त्यांचे आहेत. हयाचा संकेत कुटुंबाकडे किंवा नातेवाईकांकडेहि असू शकतो. "वेड लागलेले" - तुलना योहान 10:20. येशूंचा देवाप्रति उत्साह व आवेग दांडगा होता; त्यांच्याठायी लोकांना शिकविण्याची आणि लोकांची मदत करण्याची इच्छा इतकी प्रबळ होती की ज्या सामान्य माणसांनी अशा प्रकारचा अनुभव स्वतः घेतलेलाच नव्हता त्यांना येशू एक असामान्य व्यक्ती भासत असत. तुलना योहान 2:13-17. अशाच कारणांमुळे प्रत्येक शताब्दीत येशूंचे काही शिष्य आणि विश्वासू वेडे किंवा मूर्ख समजले गेलेत. पहा प्रेषि 26:24. **22**

**3:22** येशूंच्या शिकवणीविषयी आणि वागणुकीविषयी यहूदी धार्मिक पुढाऱ्यांकडे वेगळेच स्पष्टीकरण होते; येशू सैतानाच्या आधीनतेत आहेत असे ते म्हणत होते. "बालजबूल" - नोट्स मत्त 10:25. येशूविषयी काय विश्वास करावा, हा निर्णय प्रत्येकाने घ्यावयाचा आहे. येशू वेडपट किंवा दुष्टात्माग्रस्त किंवा ठरवून आणि योजून धोका देणारे धोकेबाज होते काय? जर असे नाही तर ते देवापासून आले होते, ते सत्य बोलत होते आणि देवाची त्यांनी कार्यें केली होती. सर्व पुरावे आणि प्रमाण म्हणतात की ते परमेश्वरांकडून आले होते. **22-29**

**3:22-29** मत्त 12:25-32. **30**

**3:30** वचन 22; योहान 7:20; 8:48,52; 10:20. **31-35**

**3:31-35** मत्त 12:46-50.

**4** **1-20**

**4:1-20** मत्त 13:1-23. मार्क, मत्तयापेक्षा काही वेगळे शब्द वापरतो; तेच सत्य व्यक्त करण्याकरिता, कळविण्याकरिता तो थोडया भिन्न शब्दांचा उपयोग करतो. अकराव्या वचनांत मार्क 'देवाचे राज्य' हा शब्द वापरतो, पण मत्तय 'स्वर्गाचे राज्य' हा शब्द उपयोगात आणतो. उघडउघड आणि स्पष्टपणे हया दोन्ही शब्द समूहांचा अर्थ सारखाच आहे. हया राज्यावरचे नोट्स मत्त 4:17 हयांत पहा. मार्क काही आणखी शब्दांचा त्यांत समावेश करतो. **21,22**

**4:21,22** मत्तय अध्याय 13 हयांत ही वचनें आढळत नाहीत, पण त्याच्या सुवार्तेत इतर ठिकाणी असेच सारखे समान शब्द आढळतात. पहा मत्त 5:15; 10:26. **23**

**4:23** मत्त 13:9. **24**

**4:24** मत्त 7:2. **25**

**4:25** मत्त 13:12; 25:29. **26-29**

**4:26-29** हा दाखला केवळ मार्ककृत सुवार्तेतच आढळतो. शाब्दीक पातळीवर प्रत्येक दिवसाचे सत्य आणि वास्तविकता हीच आहे की जेव्हा उत्तम बी, उत्तम जमिनीत पेरले जाते तेव्हा अंकुर निघणे आणि त्याची वाढ होणे अनिवार्य आहे; ते टाळता किंवा थांबवता येणारे नाहीच मुळी. बी पेरणाऱ्याला ही प्रक्रिया समजली नाही तरी, कळत नसली तरी, त्याचा वाढीवर परिणाम पडत नाही. वाढ कदाचित हळू होत असेल पण ही प्रक्रिया आपोआप, स्वाभाविक होणारी अशी आहे. एखादयाच्या जीवनात किंवा संपूर्ण जगात, प्रारंभापासून कापणीच्या शेवटापर्यंत, देवाच्या राज्याविषयी हे सत्य आहे. माणसाच्या अंतःकरणात आणि ॅदयांत देवाचे वचन हे एक जिवंत शक्तिमान बी आहे जे पेरिले जाते. ते अंकुरित होईल, वाढेल आणि पीक उत्पन्न करेल पण लोकांना हे समजणार नाही की ते कसे होते किंवा ती वाढ ते पाहू शकणार नाहीत किंवा त्यावर नियंत्रणहि ठेवू शकणार नाहीत. तुलना 1करिं 3:6,7; 1पेत्र 1:23-25. सुवार्ता गाजविणाऱ्यांसाठी आणि देवाचे सत्यवचन शिकविणाऱ्यांसाठी ही एक सशक्त उत्साहवर्धक, प्रेरणा देणारी बाब आहे. त्यांनी देवाच्या वचनांच्या सामर्थ्यावर आणि देवाच्या कार्यावर मोठा आत्मविश्वास ठेवावा त्यांवर भरंवसा करून त्याप्रति श्रद्धा बाळगावी. पण तरीहि, निरंतर वाढ आणि उन्नति आहे, हे सत्य असले तरी आपल्याला देवाचे वचन किंवा देवाच्या कार्याविषयीची आपली जबाबदारी टाळता येत नाही. वचन 23,24 पहा. "कापणी" - तुलना मत्त 3:12; 13:30; प्रकटी 14:14-16. **30-32**

**4:30-32** मत्त 13:31,32. **33**

**4:33** शिष्य काही गोष्टी समजू शकले नाहीत. काही गोष्टींचे आकलन करण्याची क्षमता त्यांच्या आवाक्याबाहेर होती. तुलना योहान 16:12. आपली शिकवण प्रकाशमय आणि ज्वलंत करण्यासाठी येशू तुलना आणि समर्पक उदाहरणांचा वापर करीत असत. येशूंनी अनेक गोष्टी, तुलना व उदाहरणें वापरली असतील पण त्यांची नोंद बायबलमध्ये कदाचित केलेली नाही. तुलना योहान 20:30; 21:25. **34**

**4:34** वचन 13-20 हे येशूंद्वारे केलेल्या स्पष्टीकरणाचे एक उदाहरण आहे. मत्त 13:36-43 हे दुसरे उदाहरण होय. **35-41**

**4:35-41** मत्त 8:23-27.

## **5**1-20

**5:1-20** ही मत्तय 8:28-34 यातील घटनेविषयी विस्तारपूर्वक केलेले वर्णन आहे. मत्तय म्हणतो की तेथे दोन दुष्टात्मागग्रस्त माणसें होती. मार्क एकाविषयीचा उल्लेख करतो; तो त्याच्यावरच आपले लक्ष केंद्रित करितो आणि म्हणून तो दुसऱ्याचा उल्लेख करितच नाही. **2**

**5:2** 'दुष्टात्मा असणे' यावर मत्त 4:24 चे नोट्स पहा. **3-5**

**5:3-5** दुष्टात्मा एखादया माणसाची काय अवस्था - दशा करू शकतात याचे हे एक ठळक, ठसठशीत आणि स्वच्छ चित्र निर्माण करणारे वर्णन आहे. दुष्टात्म्याच्या नियंत्रणात असलेल्यांचे असेच हाल होतात. या माणसाचा व्यवहार अनावर, हिंसक आणि क्रूर प्रकारचा होता; त्याचे कारण हेच होते की त्याच्यात अनेक भुतें (दुष्टात्मे) होती. वचन 9. **7**

**5:7** असे वाटते की दुष्टात्म्यांना/भुतांना नेहमीच ठाऊक होते की येशू कोण आहेत - 1:24,34. **9**

**5:9** रोमन सेनेच्या तुकडीत तीन ते सहा हजार माणसे असायची. तरीपण वचन 2 आणि आठ वाचून असे वाटते की एकच आत्मा होता. हे कदाचित यावरून कळते की तेथे केवळ एकच पुढारी किंवा नेता होता, जो त्या माणसातील सैन्याचा, सेनाध्यक्ष आणि बलाढय व हुकमी सरसेनापती होता. येशूंनी प्रामुख्याने याच एका आत्म्याला संबोधित करून, त्यांशी योग्य तो व्यवहार केला. **10**

**5:10** तुलना लूक 8:31. **15**

**5:15** लोकांना कळून चुकले होते की येशूंनी अलौकिक आश्चर्यजनक सामर्थ्याचे प्रदर्शन (प्रगट) केले होते. तरीही त्यांना या गोष्टीची जाणीव झाली नाही, कळले नाही की येशू कोण होते आणि त्यांचा हेतू काय होता - दुःखाची बाब ही आहे की त्यांना ते समजून घ्यायचेहि नव्हते (वचन 17) किंबहूना त्यांची तशी इच्छाच नव्हती. **19**

**5:19** *"लोकांना सांग"*- तुलना करा येशूंच्या या निर्देशाशी व त्यांनी दिलेल्या दुसऱ्या निर्देशांशी. (1:44; 3:12). गरसेकरांच्या प्रदेशातील परिस्थिती आणि वास्तविके इस्त्राएलाच्या देशापेक्षा वेगळी होती. गरसेकर यहूदी नव्हते, त्यांना ख्रिस्ताची/मशीहाची आशा नव्हती, येशू क्वचितच तेथे जात असत. लोक समुदाय त्यांना त्यांची सेवा करण्याच्या महत्वाच्या कामगिरीत बाधा घालणार, अशी तेथे भीति नव्हती. त्याठिकाणी ते आपली सेवा पूर्णपणे करू शकत होते. जे शब्द येशूंनी त्या माणसाला म्हटले, ते त्या सर्वांवर समानतेने लागू होतात ज्यांनी आपल्या जीवनांत परमेश्वर परमेश्वराच्या कार्यांचा अनुभव घेतलेला आहे. **20**

**5:20** दकापलीस हे ग्रीक नांव आहे. याचा अर्थ म्हणजे दहा शहरें. गरसेकरांचा प्रदेश हा दकापलीस नांवाच्या भागाचा एक भाग होता. **21**

**5:21** येशू, गालील समुद्राच्या पश्चिम भागाकडे परत आले. **22-43**

**5:22-43** या ठिकाणी, मत्तय 9:18-25 मध्ये आढळणाऱ्या कमी शब्दांत केलेल्या घटनांचे, विशाल प्रमाणावर

केलेले वर्णन आहे. 25

**5:25** वचन 42. याईराच्या मुलीपेक्षा या स्त्रीने कितीतरी दीर्घकाळ हा त्रास भोगलेला होता. 26

**5:26** तिच्या रोगाचा उपचार करणे हे त्या काळच्या डॉक्टर व औषधांच्या पलीकडची गोष्ट होती. केवळ तिच्याठायी असलेला भक्कम विश्वास डॉक्टर व मानवी उपचारांपेक्षा कितीतरी श्रेष्ठ होता. तुलना निर्ग 15:26; स्तो 103:3. 30

**5:30** लूक 8:46. ज्या लोकांचा विश्वास येशूंवर असतो त्यांच्या गरजा भागविण्यासाठी प्रभु येशूंतून देवाचे अलौकिक व परमेश्वरीय सामर्थ्य ओसंडून वाहत असते. त्या स्त्रीने आपला विश्वास लपवून ठेवावा, गुप्त ठेवावा अशी येशूंची इच्छा नव्हती; सर्वासमक्ष तिची प्रशंसा करून तिच्या आशीर्वादाची घोषणा करण्याची येशूंची प्रबळ इच्छा होती, त्यांना ते हवे होते. 34

**5:34** मत्त 9:22. लोकांच्या दुःखी, कष्टी आणि पीडामय हृदयांत शांति स्थापित करावी, हे एक महत्वाचे कारण होते, ज्याकरिता येशू या जगात आले. लूक 2:14; योहान 14:1,27; 20:19. 35

**5:35** ही माणसे आशा सोडून देण्याच्या बेतात होते आणि याईरनेहि तसेच करावे असा त्यांनी प्रयत्न केला. एखादयाचा मृत्यू त्या व्यक्तिला येशू ख्रिस्तांच्या आटोक्याबाहेर घेऊन जात नाही या गोष्टीची त्यांना जाणीव नव्हती; कारण येशूंना मृत्यूवर अधिकार असल्यामुळे जसे आजाऱ्यांना बरे करणे, मृत्यूशय्येवर असलेल्यांना सहज स्वास्थ्य देणे सोपे होते तसेच मेलेल्यांला जिवंत करणेहि त्यांच्यासाठी अगदी सोपे होते. 36

**5:36** याठिकाणी विश्वासूंनी जीवनाच्या अनुभवांत आमरण हे शब्द लक्षात ठेवावेतच असे हे शब्द आहेत. भीतिला तोंड दिले नाही, थांबविले नाही तर त्याद्वारे आपला विश्वास जवळजवळ कमी करण्याची किंवा समूळ नष्ट करण्याची शक्यता असते. विश्वासाला दृढ धरून त्याप्रमाणे केले तर त्यामुळे आपली भीति नाहीशी होते. नव्हे, दृढ विश्वास कार्यरत झाला तर आमची भीति निघून जाते. 39,40

**5:39,40** मत्त 9:24. 41

**5:41** येशू अरामी भाषा बोलत असत. त्या भागात, त्या काळी बोलल्या जाणाऱ्या इब्री भाषेसारखीच ही भाषा होती. 43

**5:43** पहा 1:44; 7:36; मत्त 8:4.

## 6 1-5

**6:1-5** मत्त 13:54-58. नासरेथ हे येशूंचे गांव होते. 5

**6:5** देवाची इच्छा अशीच असते की त्यांनी सर्वांचे कल्याण करावे, त्यांच्यासाठी उत्तम कृत्यें करावी पण माणसाठायी असलेल्या अविश्वासामुळे हे सर्व करणे प्रभु येशूंना अशक्य होते. कमतरता येशूंत नाही पण लोकांत आहे देवाने विश्वासाचा मार्ग अशा पद्धतीने तयार केला आहे की लोकांनी तो विश्वास बाळगून देवाचा वैशिष्टयपूर्ण/खास आशीर्वाद त्याद्वारे प्राप्त करून घ्यावा. (9:23; मत्त 9:22,29; 21:22; योहान 11:40). नोट्स – स्तो 78:41. 6

**6:6** "आश्चर्य वाटले" - तुलना मत्त 8:10- 7-11

**6:7-11** मत्त 10:1,9-14. 12

**6:12** हयाकडे लक्ष दा की पश्चाताप हा येशूंच्या संदेशाचा/उपदेशाचा एक प्रमुख भाग होता. पश्चातावर त्यांनी जास्त भर दिला. नोट्स मत्त 3:2; 4:17. 6:13 याकोब 5:14. **14-29**

**6:14-29** मत्त 14:1-12. **15**

**6:15** "एलीया" - मला 4:5; मत्त 11:14; 17:10; योहान 1:19-23. **20**

**6:20** हेरोद हा कमजोर वृत्तिचा/स्वभावाचा होता. त्यामुळे त्याला कळलेच नाही की एका नीतिमान व पवित्र व्यक्तिविषयी, ज्याचा तो सन्मान करितो त्याने काय करावे? **30**

**6:30** वचन 7-13 याकडे पुन्हा जातो. **31**

**6:31** पहा 3:20. **30-34**

**6:30-34** मत्त 14:13-21. **34**

**6:34** मत्त 9:36. **37**

**6:37** "200 चांदीची नाणी" - ग्रीकमध्ये "दोनशे दीनार" - एका मजुराची, एका दिवसाची कमाई/मजूरी एक दीनार इतकी होती. (मत्त 20:22). **45-56**

**6:45-56** मत्त 14:22-26.

# 7 1-23

**7:1-23** मत्त 15:1-20. **19**

**7:19** "मनांतून बाहेर निघते" - पहा प्रेषित 10:9-16. जुन्या करारांतील नियम शुद्ध व अशुद्ध भोजनाद्वारे अध्यात्मिक सत्य शिकवित होते. आता, हे 'शब्दशः अर्थाचे नियम' सोडून व टाकून देऊन अध्यात्मिक धडे/शिकवण शिकून घेण्याचा समय आला होता. नोट्स लेवी अध्याय 11. **24-30**

**7:24-30** पहा मत्त 15:21-28. सीरियन फिनीशिया हा जमिनीचा पटट होता जो भूमध्य समुद्राला लागून थोडासा इस्त्राएलाच्या उत्तरेकडे होता. त्या वेळी हा भूभाग सीरियाच्या आधीन होता (तो सीरीयाच्या ताब्यांत होता). हया जमिनीच्या पटट्यावर राहणाऱ्या लोकांना यहूदी लोक कनानी म्हणत असत. **29**

**7:29** या स्त्रीचे उत्तर तिच्या प्रभु येशूंवरील विश्वासावर आधारलेला होता. (मत्त 15:28). **31**

**7:31** सिदोन हे एक महत्वाचे प्रसिद्ध शहर होते. सोरच्या उत्तरेकडे सुमारे 40 कि.मी. दूर ते वसलेले होते. येशू प्रथम उत्तरेकडे आणि नंतर दक्षिणपूर्वेस दकापलीस येथे का गेले हयाचे कोणतेच कारण दिलेले नाही. पण येशू काय व कोण आहेत हयावरून आपण पूर्ण खात्रीने विचार करू शकतो की ते एखादया व्यक्तिची किंवा लोकांची मदत करण्यासाठी आणि त्यांना आशीर्वाद देण्यासाठीच तेथे गेले असावेत. "दकापलीस" - 5:20. **33**

**7:33** पहा 8:23; योहान 9:6. **34**

**7:34** लोकांची पीडा व वेदना आणि दुःख पाहून येशू स्वतः दुःखी होत असत. मत्त 8:17; यश 63:9. तुलना रोम 8:26. इप्फाथा हा शब्द अरामी भाषेचा आहे. (5:41). **36**

**7:36** पहा 1:44; 5:43; मत्त 8:4.

# 8 1-10

**8:1-10** मत्त 15:32-39. 10

**8:10** मगदान (मत्त 15:39) हे या क्षेत्रात होते. 11-21

**8:11-21** मत्त 16:1-12. 22

**8:22** गालील समुद्राच्या उत्तर काठावर बेथसैदा हे नगर होते. 24

**8:24** आंधळेपणा दूर करण्याचे सामर्थ्य लाळ किंवा थुंकीत नसते; किंवा त्याला बरे करण्यासाठी येशूंनी त्याला स्पर्श करावा हेहि आवश्यक नव्हते (मत्त 8:8,13). कदाचित अशा कृत्यांनी (7:33) येशू विश्वासाला प्रोत्साहन व उत्तेजन देत होते. 24,25

**8:24,25** प्रारंभी तो स्पष्ट पाहू शकला नाही. अशाप्रकारे हीच एक घटना आहे जेथे येशूंनी टप्प्याटप्प्याने त्याला बरे केले. हयाचे कारण दिलेले नाही. कदाचित सुरवातीला त्या व्यक्तिचा विश्वास अल्प किंवा कमजोर होता आणि येशूंनी वापरलेल्या हया पद्धतीमुळे नंतर त्याचा विश्वास वाढत गेला. बरे होण्याची इच्छा बाळगणारे जेव्हा हयाविषयी वाचतील किंवा ऐकतील तेव्हा त्यांनी धीर धरावा, त्यांची किंमत वाढावी की येशू टप्प्याटप्प्यानेहि बरे करू शकतात आणि ताबडतोब रोग बरा झाला नाही तरी त्यांनी निराश होता कामा नये, असे शिकविण्याची येशूंची इच्छा असावी. अध्यात्मिक क्षेत्रातहि कधी कधी लोकांना हळू हळू अध्यात्मिक प्रकाश दिला जातो. 27-38

**8:27-38** मत्त 16:13-27. 38

**8:38** तुलना मत्त 10:32,33; रोम 1:16. गर्व, अहंकार किंवा माणसांची भीति किंवा दुसऱ्यांची स्वीकृति प्राप्त करून घेण्याची प्रवृत्ति लोकांना येशूंच्या आणि त्यांच्या उद्धाराच्या सुवार्तेपासून लाजिरवाणे करिते.

## 9 1

**9:1** मत्त 16-28. 2-13

**9:2-13** मत्त 17:1-13. 6

**9:6** लूक 9:33. जेव्हा आपल्याला कळत नाही की आपण काय म्हणावे/बोलावे तेव्हा शांत/चुप राहिलेले अधिक उत्तम असते. पेत्राच्या वेडपटपणामुळे आणि त्याने केलेल्या अज्ञानाच्या टिप्पणीमुळे आपण शिकतो की शिष्यांनी मोशे व एलीया यांना ओळखले होते. (हे दोघे अनेक शताब्दीपूर्वी मरण पावले होते) 12

**9:12** येशू प्रभु त्यांना जुन्या करारांकडे संकेत करतात. पहा यशया अध्याय 53 आणि स्तो 22. 14-32

**9:14-32** हा भाग मत्तय 17:14-23 चे सविस्तर व पूर्ण वर्णन आहे मत्तय याविषयी तर्क (विवाद) करित नाही. येशूंचे शिष्य त्या दुष्टात्माग्रस्त मुलाला बरे करू शकले नव्हते म्हणून वाद-विवादाचा विषय हाच होता. शिवाय येशूंठायी अद्भुतें करण्याच्या सामर्थ्याशी देखील हा वाद संबंधित असावा. 15

**9:15** "आश्चर्य झाले" - कदाचित येशू अचानक आल्यामुळे ते आश्चर्यचकित झाले होते. 16

**9:16** येशू त्यांच्या वादविवादाच्या कारणापासून अज्ञान नव्हते कारण त्यांचा वादाचा विषय त्यांना ठाऊक होता (मत्त 9:4; योहान 1:47-49; 12:24,25; 21:17) पण तरीहि येशू त्या मुलाच्या बापाला बोलण्याची हिंमत व प्रेरणा देत होते. 17,18

**9:17,18** याठिकाणी दिलेल्या दुष्टात्माग्रस्त लोकांची लक्षणे - चिन्हें पाहा पहा - वचन 20,22,26. 22

**9:22** त्या माणसाने येशूंच्या सामर्थ्याविषयी संशय बाळगला होता. कदाचित त्याने असा अंदाज आणि विचार केला असावा की जर येशूंचे शिष्य काहीही करू शकले नव्हते तर येशूहि काही करू शकले नसते. ख्रिस्ती लोकांतील विश्वासाचा अशक्तपणा - दुर्बळपणा पाहून, मनुष्य येशूंचे अधिकार व सामर्थ्य हयाविषयी चुकीचा निष्कर्ष काढून येशूंना कमी समजू शकतात त्यांच्या व्यक्तित्वावर संशय करून त्यांना कमजोर लेखू शकतात. **23**

**9:23** हयाठिकाणी पुन्हा आपल्याला हया गोष्टीची प्रचिती येते की बायबलच्या शिकवणीनुसार, विश्वास देवाला कार्य करण्याचा मार्ग मोकळा करतो, उघडतो परंतु अविश्वास मात्र त्यांना कार्यरत होण्यापासून थांबवू शकतो, बाधा आणू शकतो. (6:5). विश्वास, देवाच्या सामर्थ्याकरिता, चमत्कारांकरिता, एक वैशिष्टयपूर्ण मार्ग तयार करतो. विश्वासामुळे प्रभूंच्या सामर्थ्याला प्रचंड बळ प्राप्त होते, नव्हे ते वाढते. **24**

**9:24** तो मनुष्य आपल्या अशक्त विश्वासाविषयी जागृत होता, त्याच्या ॅदयातील विश्वास व अविश्वासविषयीची त्याला जाणीव होती. आणि म्हणून तो वचन 21 मध्ये सुद्धा येशूंकडे मदतीची हाक मारितो. येशूंनी त्याला त्याच्या दोन्ही प्रार्थनांचे उत्तर दिले. सर्व विश्वासू लोक अशाप्रकारच्या अविश्वासा च्या संघर्षाचा सामना करीत नाहीत काय? ज्याने त्या मनुष्याला मदत केली तेच आपलीहि मदत करतील (इब्री 12:2). **25**

**9:25** हा दुष्टात्मा अशा प्रकारचा होता की त्याने त्या मुलाची ऐकण्याची व बोलण्याची क्षमता हिरावून घेतली होती, नाहीशी केली होती. हाच एक समय आहे की येशूंनी त्या दुष्टात्म्याला अशी आज्ञा दिली की त्याने त्याच्यातून निघावे आणि पुन्हा कधी त्याच्यात प्रवेश करूं नये. आपल्याला ठाऊक आहे की येशूंनी इतर वेळीहि तशीच आज्ञा केली असावी. मत्त 12:43-45 यावरून कळते की कधीकधी दुष्टात्मा पुन्हा प्रवेश करू शकतात; या उदाहरणावरून ते अधिक स्पष्ट होते. **29**

**9:29** असे वाटते की काही दुष्टात्मा, दुसऱ्या दुष्टात्म्यांपेक्षा अधिक हटट्ी, ठाम आणि निश्चयी असतात; आणि त्यांना हाकून लावण्यासाठी फार अधिक गंभीर आणि चिवटपणे तसेच एक प्रकारच्या हटटने केलेल्या प्रयत्नांची गरज असते. **30,31**

**9:30,31** ही शिकवण आतापर्यंत संपूर्ण विश्वासाठीची नव्हती, ती केवळ त्यांच्या शिष्यांसाठीचीच होती. येशूंची शिकवण तोपर्यंत तरी केवळ शिष्यांकरिताच मर्यादित होती. पण आज, आता ही शिकवण येशूंच्या संदेशाचे केंद्र आहे, आता मात्र शिष्य संपूर्ण जगात त्या संदेशाची घोषणा करणार होते. (लूक 24:45; 1करिं 15:3,4). **32**

**9:32** वचन 10; 8:31-33. ते शिष्य होते तरी, अध्यात्मिक बाबींत ते अदयापहि कमजोर होते, कमी होते - आजहि जसे येशूंचे अनेक शिष्य आहेत तसेच. तुलना पौलाने केलेली ती अद्भुत प्रार्थना जी इफि 1:17-19 हयांत नमूद केली आहे. **34**

**9:34** लूक 22:24; पहा यिर्म 45:5. **35**

**9:35** मत्त 18:4; 20:26-28. **37**

**9:37** मत्त 18:5; 10:40. **38**

**9:38** येशूंच्या शिष्यांमध्ये नेहमी 'संकुचितपणाची' (संकीर्णता) आणि 'वाटून न घेण्याची' किंवा खास 'फक्त एकासाठीचीच' असण्याची वृत्ती किंवा लहर असण्याचा धोका असतो; हा धोका, की केवळ त्यांचा समुदायच

'एकमेव सत्य समुदाय' आहे आणि देवाची सेवा करण्याचा अधिकार केवळ त्यांनाच/त्यांचाच आहे. प्रियांनो इतरांना वगळण्याची भावना, त्यांना नालायक, अयोग्य समजण्याची वृत्ती ही मूळांतच विश्वासूंच्या मनांत नसावी, कारण तसे असणे अयोग्य- अनुचित आहे. तुलना गण 11:25-29; 1करिं 1:10-13. **40**

**9:40** मत्त 12:30 ची ही दुसरी बाजू (भाग) आहे. **41**

**9:41** मत्त 10:40-42. **42-47**

**9:42-47** मत्त 18:6-9; 5:29,30. **48**

**9:48** हा यशया 66:24 हयातून घेतलेला एक भाग आहे. नरकाची तुलना अशा एका विशाल आणि भीषण केरकचऱ्याच्या ढिगाशी केली जाऊ शकते जेथे निरंतर अग्नि पेटत असते आणि जेथे शरीराला कचऱ्यांतील कीडे सतत खात राहतात. यरूशलेमेच्या भींतिबाहेर गेहेन्ना दरीत अशाच प्रकारचा केरकचऱ्याचा ढीग होता. गेहेन्ना शब्दाचे भाषांतर 'नरक' असे सुमारे बारादां नवीन करारात वारंवार केलेले आहे (मत्तय व मार्कात अनेकदां आणि लूक व याकोबात एकदां). पापी लोकांची प्रतीक्षा करीत असणारे भयंकर, अटळ, निश्चित व न चुकविता येणारे चित्र येशूंनी दाखविले; प्रियांनो त्याविषयी अजाण असणे हा महामूर्खपणा आहे. (पहा मत्त 5:22; लूक 16:23,24; प्रकटी 20:14,15). जे कोणी हया जगिक केराची, कचऱ्याची निवड करितात (फिलि 3:8) आणि येशू ख्रिस्तांद्वारे येणार उद्धार नाकारतात, अमान्य करितात, जे सर्व लोक स्वतःला दुष्ट-लज्जास्पद आणि कवडी मोलाचे व कुचकामाचे (टाकाऊ असे) करितात ते जागतिक केराच्या (कचऱ्याच्या) ढिगातच जातील, तेच त्यांचे ठिकाण असेल. हाच देवबापांचा सिद्ध न्याय असेल. म्हणूनच किती गंभीरतेने, प्रत्येक मानव प्राण्याने, स्वतःला आपल्या पापांपासून आणि पापांत पाडणाऱ्या प्रभावापासून कापून टाकावे, स्वतःला त्यापासून वेगळे करावे. **49**

**9:49** या वचनाचा अर्थ आणि त्याच्या मागच्या-पुढच्या वचनांशी त्याचा असलेला संबंध समजणे जरा अवघड (कठीण) आहे. मीठ आणि अग्नि याठिकाणी एकत्र जुळलेले आहेत, त्यावरून हे वर्णन कळते की माणसाला कोणकोणत्या गोष्टींतून जावे लागेल. मीठ सडण्यापासून सुरक्षित ठेवते, अग्नि भस्म करते. जर येथे 'प्रत्येकजण' म्हणजे प्रत्येक मनुष्य आहे तर, या वचनाचा अर्थ असा होऊ शकतो की उद्धार प्राप्त न केलेले लोक नरकात अग्नीचा अनुभव करतील आणि ज्यांनी उद्धार प्राप्त केलेला आहे ते आता वर्तमानकाळीच अग्नीने शुद्ध केले जातील. (स्तो 66:12; मला 3:2; 1पेत्र 1:7) **50**

**9:50** मत्त 5:13. येशूंप्रति शिष्यत्व प्राप्त करण्याकरिता, येथे 'मीठ' एका उदाहरणाच्या रूपात वापरले गेले आहे; ते शिष्यत्वाचे लक्षण व प्रमुख चिन्ह दर्शविते. तुलना लूक 14:34 च्या संदर्भात. ख्रिस्ताच्या खऱ्या सात्विक शिष्याचे चिन्ह आहे "शांति". तुलना मत्त 5:9.

## 10 1-16

**10:1-16** पहा मत्त 19:1-15. **1**

**10:1** पहा 2:13; 4:2; 6:6,34; मत्त 4:23; स्तो 24:4,5. येशू ख्रिस्तांचा आनंद आताहि तोच आहे की लोकांनी सत्य शिकावे; लोकांना सत्याची शिकवण देण्यात येशूंना प्रचंड समाधान मिळते. **15**

**10:15** मत्त 18:3. **17-31**

**10:17-31** मत्त 19:16-30 चे नोट्स पहा. **17**

**10:17** तो मोठया उत्कंठेने आणि आदर भावनेने आला होता पण तरीहि दुःखी होऊन परत गेला (वचन 22). **21**

**10:21** येशूंनी या तरूणासमोर एक अतिशय कठीण परीक्षा ठेवली. याचे कारण हेच होते की त्यांचे 'पवित्र-ईश्वरी' मन त्या तरूणाकरिता प्रेमाने भरून वाहत होते. येशूंना त्याचे कल्याण हवे होते. या गोष्टीची आपल्याला खात्री असावी की ज्यावेळी प्रभु आपल्या काहीतरी कठीण आणि दुःखदायक गोष्ट करावयास सांगतात, ती यासाठी असते की ते आपल्यावर प्रीति करितात आणि आपण तसेच करण्याची गरज असते. **22**

**10:22** येशू ख्रिस्त आणि त्यांनी दिलेले अनंत जीवन हयांहून अधिक मोल हा तरूण स्वतःच्या संपत्तिला मिळकतीला देत होता. त्याच्या संपत्तिचे मोल त्याने अधिक जाणिले. जर एखादयाने येशूंची आणि त्यांच्या अनंत जीवनाची किंमत कमी लेखिली तर देवाने त्याला ते कां दयावे? तुलना नीति 4:7; लूक 14:33. **24**

**10:24** "मुलांनो" - येशू त्यांना 'मुलांनो' असे म्हणाले, कारण ते वयस्क असले आणि पूर्ण विकसीत झाले होते तरी अध्यात्मिक दृष्टीने त्यांचे शिष्य त्यांच्यासाठी लहान मुलांप्रमाणेच होते. पहा मत्त 10:42. **30**

**10:30** जे येशूंचे शिष्य होऊन त्यांचे अनुसरण करतात त्यांच्या जीवनांत क्लेश, छळ असतीलच मत्त 24:9; लूक 11:29; 21:12; योहान 15:20; प्रेषि 7:52; 1थेस्स 3:4; 2तीम 3:12. परंतु त्या छळाची तुलना, त्या महिमेशी करता येत नाही जी त्यांना भविष्यकाळी लाभणार आहे. रोम 8:18; 2करिं 4:17. **32-45**

**10:32-45** मत्त 20:17-28. **32**

**10:32** येशूंच्या सांगण्याच्या पद्धतीत, तऱ्हेत आणि त्यांच्या चेहऱ्यावर असे काही भाव होते की त्यांच्या शिष्यांची घाबरगुंडी उडाली. ते ऐकून शिष्य एकाएकी घाबरले आणि दचकले. **34**

**10:34** तुलना लूक 9:51; यश 50:7. **35**

**10:35** त्यांची आई त्यांच्याबरोबर होती. आईसह त्यांनी येशूंना विनंती केली. (मत्त 20:20,21). **38**

**10:38** "प्याला" हया शब्दाप्रमाणेच "बाप्तिस्मा" हा अलंकारिक चिन्ह किंवा संकेत म्हणून वापरलेला आहे. येशू ख्रिस्त येथे पाण्याच्या बाप्तिस्म्याविषयीचा उल्लेख करीत नाहीत; हयाठिकाणी परीक्षा, मोह, पीडा आणि दुःखात बुडण्याविषयी म्हटलेले आहे. तुलना लूक 12:50. **46-52**

**10:46-52** मत्त 20:29-34. मत्तय म्हणतो की त्या वेळी दोन आंधळे बरे झाले होते. मार्क त्यातील एकाला विशिष्ट महत्वाचे स्थान देतो आणि त्याच्याकडे लक्ष वेधितो. (तुलना 5:1,2). **51**

**10:51** इब्री शब्द "रब्बी"चा अर्थ आहे माझे गुरूजी/माझे शिक्षक. **52**

**10:52** पुन्हा एकदा आपण विश्वासाचे सामर्थ्य पाहतो. (9:23; मत्त 8:13; 9:22,29).

## 11 1-11

**11:1-11** मत्तय 21:1-9. **10**

**11:10** परमेश्वराने राज्याची प्रतिज्ञा दावीद व त्याच्या वंशजांशी केली होती. (पहा 2शमु 7:11-14; मत्त 1:1; लूक 1:32,69). **11**

**11:11** "बारा" - अर्थात बारा प्रेषित (3:16-19). **12-25**

**11:12-25** मत्तय 21:12-22. **18**

**11:18** शास्त्री व याजकगणांना आपले पद, अधिकार आणि सन्मान अतिशय प्रिय होते आणि येशू ती सर्वकाही बदलून टाकतीलच अशी त्यांच्या मनात भीति होती. **20**

**11:20** मत्तय स्पष्ट करितो की मागील दिवशी ते अंजिराचे झाड काही अंशी वाळलेले होते. परंतु आता मात्र ते पूर्णपणे वाळले होते; अर्थात "मूळापासून". **24**

**11:24** येशू पुन्हा एकवार विश्वासाच्या सामर्थ्यावर, वैशिष्टयावर भर देतात, (2:5; 5:34; 6:5; 10:52; मत्त 9:22). जर आपण खरोखर विश्वास धरिला की प्रभूंनी आपली प्रार्थना ऐकून त्याचे उत्तर दिले आहे तर हे योग्य आणि बरोबर आहे आणि असेच व्हायला हवे. पण अशा प्रकारचा विश्वास कशाप्रकारे शक्य होईल? हे हयाद्वारे होत नाही की स्वतःशी बोलून किंवा विचार करून म्हणावे की प्रभूंनी माझे ऐकिले आहे आणि तरीहि वास्तविक पाहता आपला विश्वासच नाही की त्यांनी ते ऐकिलेले आहे, खरा व सत्य विश्वास तेव्हाच येतो जेव्हा आपण देवाच्या वचनाला प्रतिसाद देतो, ते मानितो. सत्य विश्वास, आपल्या ॅदयांत पवित्र आत्म्याने केलेल्या कार्याचाच परिणाम आहे. तुलना रोम 8:26; 1योहान 5:14,15; पहा मत्त 9:22. **25**

**11:25** "प्रार्थना करतांना" हया शब्दांकडे लक्ष दया. बायबल असे शिकवित नाही की एखादया विशिष्ट तऱ्हेने बसून किंवा उभे होऊन, प्रार्थना केल्यानेच आपली प्रार्थना ऐकली जाईल; किंवा असेहि नाही की एखादी खास मुद्रा, दुसऱ्यापेक्षा उत्तम आहे. (मत्त 6:14,15 शी तुलना करा). **27-33**

**11:27-33** मत्त 21:23-27.

## 12 1-12

**12:1-12** मत्त 21:33-46. **13-17**

**12:13-17** मत्त 22:15-22. **15**

**12:15** "कपटी–ढोंगी" हयाविषयी इतर वचने : मत्त 6:2,5,16; 7:5; 23:13,28; लूक 12:1; 19:15; 1तीम 4:2; 1पेत्र 2:1. **18-27**

**12:18-27** मत्त 22:23-33. **28-37**

**12:28-37** मत्त 22:34-46. **29**

**12:29** अनु 6:4. "देव/प्रभु" - हयाचा संकेत किंवा उल्लेख "याहवे" करिता केलेला आहे. जुन्या करारात हे देवाचे नांव आहे. **33**

**12:33** पहा – 1 शमु 15:22; होशे 6:6; मीखा 6:6-8. **34**

**12:34** हया माणसाने थोडी अध्यात्मिक ज्ञान आणि थोडया दीनतेचे प्रदर्शन केले. त्याने केलेल्या अंगिकाराद्वारे आपल्याला त्याची नम्रता दिसते. "प्रभु येशू अगदी खरे बोललेत" असा अंगीकार त्याने केला होता. तो देवाच्या राज्याजवळ होता, पण तरीहि तोपर्यंत त्याच्या आत नव्हता. प्रत्येक पिढीत असेच पुष्कळ लोक आहेत, हयात शंकाच नाही. नोट्स – देवाचे राज्य – मत्त 4:17. **35**

**12:35** "दावीदाचे पुत्र" - नोट्स – मत्त 1:1. **36**

**12:36** "पवित्रात्म्याच्या मदतीने/स्फूर्तिने/द्वारे – पहा मत्त 22:43. **38,39**

**12:38,39** तुलना - मत्त 23:5-7. **40**

**12:40** बाहेरून ते धार्मिक दिसत होते पण आतून/गुप्तपणे लोभी, क्रूर, निर्दयी, असाहाय्य, असमर्थ व दुबळया आणि कमजोर लोकांना लुबाडणारे, गैरफायदा घेणारे होते. तुलना मत्त 23:25-28. (मत्तय 23व्या संपूर्ण अध्यायात अशा धार्मिक ढोंगी लोकांच्या मनाचे आणि मार्गाचे निर्भीकपणे, उघडरीत्या वर्णन केलेले आहे). **41**

**12:41** प्रार्थना भवनाच्या बाहेर असलेल्या अंगणात हा कोषागार होता. **42**

**12:42** ग्रीक भाषेत 'नाणे' सर्वात लहान मुद्रा होती; आणि ती त्या देशात चालत होती. तिने दोन नाणी दिली होती, त्यांपैकी एकहि तिने स्वतःसाठी राखून ठेविली नव्हती. **41-44**

**12:41-44** देवाला देण्याविषयीचे काही आवश्यक धडे येशू शिकवीत आहेत. आपण देवाला काय देतो, ते येशू आताहि पाहतात. तुलना इब्री 4:12,13. जे श्रीमंत व धनी लोक स्वतःसाठी भरपूर राखून ठेवितात पण देवाला त्यापेक्षा कमी देतात, त्यांच्या बाबतीत येशू नाखुष असतात; असे श्रीमंत लोक त्यांच्यावर काहीहि प्रभाव टाकित नाहीत; कारण त्यांच्या दृष्टीने लहान-अल्पशी भेट, मोठया राशीपेक्षा कितीतरी मोलवान व महत्वाची आहे. येशू दान देणाऱ्याची प्रवृत्ति/हेतू हयांकडे लक्ष देतात, त्या 'देण्यात' किती बलिदान केले गेले, किती किंमत मोजावी लागली हे बघतात. येशू हे पाहात नाहीत की व्यक्ती किती देतो, पण हे पाहतात की तो स्वतःसाठी किती ठेवितो. गरीब विश्वासूच्या दानांत प्रभु येशूंना विशेष रूचि आहे, गरीब विश्वासूंनी दिलेली दानें त्यांना प्रसन्न करितात. तुलना 2करिं 8:1-5,12. नोट्स 2करिं 9:15.

## 13 1-37

**13:1-37** मत्त 24:1-51. **1,2**

**13:1,2** येशूंचे शिष्य, लोकांनी केलेल्या कामाचे खूप कौतुक करू शकतात, त्यांच्या कामाच्या सौंदर्यामुळे-आकर्षणामुळे असा विचार करू शकतात की ती बहुमूल्य आहेत. पण शेवटी माणसाने केलेली श्रेष्ठतम-भव्य कार्यें वाकडी तिकडी होऊन गडगडून कोसळतील (खाली पडतील); कारण शेवटी माणसाची कृत्येंच सर्वकाही ठरवितील. पहा - यश 2:6-22; प्रकट 18:9-24. **11**

**13:11** मत्त 10:19,20. "पवित्र" - मत्त 3:16; योहान 14:16,17. **12,13**

**13:12,13** मत्त 10:21,22. **14**

**13:14** मत्त 24:15. "जेथे तो नसावा" - म्हणजे प्रार्थना भवन/मंदिर. तुलना 2थेस्स 2:4. **29**

**13:29** "त्यांचे येणे जवळ आहे" - दुसऱ्या शब्दांत "ते जवळ आहेत ते ओळखून घ्या". **30**

**13:30** "ही पीढी" किंवा "हा वंश" **32-37**

**13:32-37** येथे येशूंच्या दुसऱ्या आगमनाविषयी सतर्क, चौकस व जागृत राहण्याकडे संकेत केलेला आहे; त्याकडे लक्ष देण्यावर भर दिला आहे. (वचन 33,35,37).

## 14 1-72

**14:1-72** मत्त 26:1-75. **1**

**14:1** "वल्हांडण" - निर्ग 12:11; लेवी 23:50. 4

**14:4** शिष्य असे म्हणाले होते (मत्त 26:8) आणि त्यांत यहूदा सर्वात पुढे होता (पहा योहान 12:4,5. ही एक दुसरी विशिष्ट वेळ असावी. योहान 12:2 चे नोट्स पहा). 5

**14:5** "तीनशे चांदीची नाणी" - ग्रीक भाषेत "तीनशे दीनार" - एका मजूराची तीनशे दिवसाची मजूरी इतकी होती. 11

**14:11** विश्वासघात व धोका करण्याची संधि त्यांना मिळाली होती. जगातील सर्वात पवित्र आणि सर्वश्रेष्ठ माणसाला घात करण्याच्या हया संधिचा त्यांना आनंद झाला होता. वाईट-घृणात्मक चरित्राचे इतके चांगले प्रगटीकरण करणारे दुसरे कोणतेहि उदाहरण सापडूं शकेल काय? नाखुशीने दुष्टाई करणे ही एक गोष्ट/बाजू आहे पण त्यात आनंदी होणे, त्याचा आनंद घेणे ही दुसरी गोष्ट आहे आणि ती अत्यंत वाईट बाब आहे. 12

**14:12** "वल्हांडणाचे कोकरू" निर्ग 12:3-11. पहा योहान 1:29. 13-15

**14:13-15** जी कधी पूर्वी घडली नाही त्या घटनाक्रमाचे विस्तारपूर्वक अवलोकन/आकलन येशूंनी केले; हयावरून येशू ख्रिस्तांची योग्यता आढळते. 24

**14:24** मत्त 26:28 हयांत 'ख्रिस्तांचे रक्त सांडणे' हयाचे कारण लिहिलेले आहे. 27

**14:27** जख 13:7. 36

**14:36** "अब्बा" - अरामी भाषेतील शब्द ज्याचा अर्थ आहे 'बाप' 'पिता'. देवपित्याला हे शक्य होते की त्यांनी येशूंना दुःख आणि मृत्यूच्या वेदनांपासून वाचवावे; (येशूंचे दुःख टाळणे त्यांना शक्य होते) पण तशी त्यांची इच्छा नव्हती. "देवाने येशूंना वाचवण्याचा अर्थ माणसांकरिता तयार केलेली तारणाची योजना "देवाने रदद् करणे" आणि "मनुष्याला त्याच्या दुर्दशेत सोडून देणे" अर्थात 'अटळ असलेल्या पिडेच्या अवस्थेतच त्याला राहू देणे', असा झाला असता". 51,52

**14:51,52** केवळ मार्क हयाविषयी लिहितो. तो तरूण स्वतः 'मार्कच' असावा, नाहीतर त्याने हया घटनेचा उल्लेख कां केला हे समजणे कठीण झाले असते. 54

**14:54** मत्त 26:58 यांत लिहिलेले आहे की पेत्र तेथे कां गेला. 55

**14:55** 'सभा' - सेन्हेड्रिन - मत्त 5:22. 58

**14:58** योहान 2:19 यांत लिहिलेले येशूंचे शब्द वेडेवाकडे करून म्हणणेच आहे. मनुष्याने तयार केलेल्या, बांधलेल्या मंदिराला मी नष्ट करीन असे येशूंनी म्हटलेच नव्हते. 69

**14:69** अंगणातील समुदायाला पेत्राची शंका आली होती; त्यावर त्यांनी संशय केला होता. अनेकांनी त्याला प्रश्न विचारिले किंवा त्याच्याविषयी दुसऱ्यांना सांगितले होते - दासी (दोनदा) दुसरी मुलगी (मत्त 26:71) एक मनुष्य (लूक 22:58), कांही लोक जे विस्तव शोकित होते; प्रामुख्याने, महायाजकाच्या दासाचा नातेवाईक (योहान 18:25,26).

## 15 1

**15:1** मत्त 27:1,2. मत्तय यहूदाच्या आत्महत्येविषयी लिहितो, पण मार्क त्याकडे दुर्लक्ष करितो. 2-47

**15:2-47** मत्त 27:11-61. 14

**15:14** मत्त 27:25 पहा की आता यहूदी लोकांनी किती भयंकर गोष्ट म्हटली. 21

**15:21** स्पष्टपणे कळते की आलेक्सांद्र आणि रूफ हे दोन असे व्यक्ती होते ज्यांना त्या दिवसांहि सुवार्ता वाचणारे पुष्कळ लोक ओळखत होते. पण आपल्याला त्यांच्याविषयी कांहिहि माहित नाही. 25

**15:25** तिसरा तास म्हणजे 9 वाजता, ग्रीक भाषेत सांगितल्यास सूर्योदयानंतरचा तिसरा तास. 28

**15:28** "येशू अपराध्यांत गणले गेले" यश 53:12. पवित्र आणि निष्कलंक देवाचे पुत्र अपराधी समजले गेले. 37

**15:37** "आपला प्राण त्यागिला" - मत्त हा शब्द वापरतो की त्यांनी आपला आत्मा दिला, पण ग्रीक भाषेत हा शब्द वेगळा आहे. 38

**15:38** मत्त 27:51. 42

**15:42** सूर्यास्तानंतर यहूदी शब्बाथाचा प्रारंभ होत असे आणि दुसऱ्या दिवशी तो सूर्यास्तापर्यंत कायम राहात असे. या दरम्यान कोणत्याहि प्रकारचे कार्य केले जात नव्हते. (पहा निर्ग 20:8-11) याच कारणास्तव योसेफाला येशूंचे शरीर (शव) सूर्यास्तापूर्वी क्रूसावरून खाली काढण्याची इच्छा होती. याठिकाणी ज्या शब्बाथाचा उल्लेख केला आहे कदाचित तो विशिष्ट असा शब्बाथ होता ज्यांपासून बेखमीर भाकरीचा सण प्रारंभ होत असे. दर शनिवारी येणारा हा काही साधारण शब्बाथ नव्हता; काही विद्वान म्हणतात की येशू बुधवारी मेले, कांहीचा सल्ला आहे की ते गुरूवारी मेले, तरइतर दुसरे म्हणतात की तो दिवस शुक्रवार होता. दिवसाविषयी मतभेद व विवाद करण्यात कांहिहि अर्थ नाही. 43

**15:43** 'सभा' म्हणजे सेन्हेड्रीन - नोट्स - मत्त 5:22. येशूंना क्रूसावर ज्या लोकांनी खिळिले, योसेफ त्या लोकांच्या पक्षाचा/बाजूचा नव्हता (लूक 23:51). "देवाचे राज्य" - मत्त 4:17. 45

**15:45** क्रूसावर खिळिल्यानंतर येशू सहा तासानंतर मरण पावले होते. क्रूसावर खिळिलेल्यापैकी कांही लोक कधीकधी दोन ते तीन दिवस जिवंत राहात असत. म्हणून येशूंचे शरीर पुरण्याकरिता देण्यापूर्वी त्याने निश्चितपणे पूर्णतः खात्री करून घेतली की येशू खरोखरच मेले आहेत; त्याचप्रमाणे यहूदी पुढाऱ्यांनाहि निश्चित ठाऊक होते की येशू मेले आहेत. मत्त 27:62-66 पहा.

## 16 1-8

**16:1-8** मत्त 28:1-8. 1

**16:1** कोणतेही शव पुरण्यापूर्वी ही एक प्रथा होती. स्पष्ट कळते की या स्त्रियांना येशूंच्या जिवंत उठण्याविषयीची खात्री नव्हती; कारण येशूंचे पुनरूत्थान होणार नाही या विचारानेच त्यांनी त्या प्रथेचे पालन केले होते. 5

**16:5** हा एक देवदूत होता जो मनुष्याच्या रूपांत आला होता. (मत्त 28:2). देवदूतांवर पहा - उत्प 16:7. 7

**16:7** ज्या पेत्राने येशूंना नाकारले होते त्याच्यासाठी येशूंजवळ एक विशेष संदेश होता. पेत्राने स्वतःचा धिक्कार करावा किंवा आता यापुढे तो येशूंचा शिष्य गणला जाणार नाही असा विचार करावा, हे येशूंना नको होते. म्हणून ते म्हणाले की "पेत्राला" सांगा. जे लोक भयंकर चुका करितात, अशांवर प्रभु कधीकधी खूपच

प्रेम करितात आणि त्यांच्याविषयी विचारशील असतात. 8

**16:8** याचा अर्थ असा आहे की त्यांनी वाटेने जातांना, शिष्यांजवळ पोहंचेपर्यंत कोणालाहि कांहीहि सांगितले नव्हते, नव्हे त्या कोणाशी बोलल्याच नव्हत्या. (मत्त 28:8; लूक 24:9,19). 9-20

**16:9-20** काही ज्ञानी म्हणतात की ही वचनें मार्काने लिहिलेल्या मूळ सुवार्तेचा भाग नव्हते पण कोणीतरी ती नंतर त्यांत जोडली होती (समाविष्ट केली होती). ही गोष्ट खरी आहे की प्रारंभी असलेल्या हस्तलिखितात किंवा मूळ प्रत यांत ही वचनें आढळत नाहीत. असे कोणतेही प्रमाण नाही की ही वचनें हस्तलिखितात नव्हती. आमचा विश्वास आहे की मार्काने किंवा कोणीहि ज्याने ही वचनें लिहिली ती पवित्र आत्म्याच्या प्रेरणेनेच लिहिली. ही वचनें परमेश्वराच्या पवित्र आत्म्याच्या स्फूर्तिने लिहिली गेल्यामुळे त्यांना "परमेश्वराने म्हटलेले वचन" असेच समजले/मानिले जावे. 9

**16:9** योहान 20:11-18; लूक 8:2. 11

**16:11** या बाईने ती साक्ष दिली नसती तरी त्यांनी येशूंच्या जिवंत उठण्यावर विश्वास ठेवायला हवा होता. येशू स्वतःच म्हणाले होते की मी मेल्यानंतर पुन्हा जिवंत होईन (9:31; मत्तय 16:21; 17:22,23). परंतु साक्ष दिल्यानंतरहि त्यांनी अविश्वासच केला; आणि विश्वास ठेविलाच नाही. (वचन 12,13; पहा लूक 24:13-32). हे या गोष्टीचे प्रमाण आहे की ते अंधविश्वासू नव्हते किंवा एखादयाच्या गोष्टीवर सोप्या रीतिने विश्वास ठेवून धोका खाणारे लोक नव्हते; अर्थात ते प्रमाणाशिवाय विश्वास करणारच नव्हते. 14

**16:14** "अकरा" - यहूदाला वगळून ते अकरा, प्रमुख आणि विशेष शिष्य होते. (मत्त 27:5). 15

**16:15** 1करिं 15:1-8 यांत येशू आपल्या शिष्यांना (तेव्हा आणि आताहि) आज्ञा देतात की त्यांनी या पृथ्वीवरील प्रत्येकाला उद्धाराची सुवार्ता सांगावी, त्यांच्या उपदेशाचा प्रचार करावा (मत्त 28:18-20; लूक 24:47,48; योहान 20:21; प्रेषि 1:8). येशूंनी सर्वांसाठी आपला जीव दिला म्हणून त्यांनी सर्वांसाठी काय केले, हे लोकांना कळावे असे येशूंना हवे आहे (त्यांची इच्छा आहे); (2करिं 5:14,15; 1तीम 2:6; 1योहान 2:2). प्रत्येक विश्वासूने आपल्या शक्ती व क्षमतेनुसार, सर्व जगाला येशूंची सुवार्ता गाजविण्याचा भरसक प्रयत्न करावा. 16

**16:16** नोट्स – बाप्तिस्मा – मत्त 3:6. तारण विश्वासाद्वारे प्राप्त होते (योहान 3:16; 5:24; 6:47; प्रेषि 16:31; रोम 1:17; 3:22,25; गल 2:16; इफि 2:8,9) तारण प्राप्त करून घेण्यासाठी बाप्तिस्मा आवश्यक नाही, पण ज्यांचा विश्वास येशू ख्रिस्तांवर आहे त्यांनी बाप्तिस्मा घ्यावा आणि उघड व स्पष्टपणे आपल्या विश्वासाची साक्ष दयावी. जर एक व्यक्ती म्हणतो की तो येशू ख्रिस्तांवर भरंवसा ठेवितो, पण जर तो बाप्तिस्मा घेत नसेल तर तो विश्वासूच नाही असा संशय येतो, "जो बाप्तिस्मा घेत नाही त्याला दंड होईल" असे येशू म्हणाले नाहीत, पण "जो कोणी विश्वास करणार नाही तो शिक्षेपासून मुक्त होऊ शकणार नाही" असे येशू म्हणाले. तुलना योहान 3:17,18. येथे शिक्षा/दंड याचा अर्थ "नरकदंड" असा होईल. 17,18

**16:17,18** याचा अर्थ असा नव्हे की या संपूर्ण कृपा युगात प्रत्येकाच्या जीवनात ही चिन्हें असतीलच. अनेक खऱ्या व सात्विक विश्वासूंत यांपैकी एकही चिन्ह नाही; त्यांतील एकही चिन्ह त्यांनी अनुभविले नाही ही एक वास्तविकता व खरी गोष्ट आहे. ही त्या लोकांविषयीची बाब आहे "जे विश्वास धरतील", त्या लोकांविषयी मुळीच नव्हे ज्यांच्याकडे असाधारण विश्वास असेल किंवा ज्यांचे जीवन जास्त समर्पित असेल. या वचनांचा

अर्थ असा असावा की ही चिन्हें 'जागतिक ख्रिस्ती मंडळीत' असतील. दुष्टाला काढण्याविषयी : प्रेषि 5:16; 8:7; 16:18; 19:13-16. नवीन भाषा : प्रेषि 2:4; 10:46; 19:6; 1करिं 12:10,28,30; 13:1; 14:2-39. सापासाठी – लूक 10:19; प्रेषि 28:3-5. बरे करण्याविषयी – प्रेषि 28:8,9; याकोब 5:14,15. आपले सामर्थ्य प्रदर्शित करण्यासाठी किंवा दुसऱ्यांवर आपला प्रभाव घालण्यासाठी ही चिन्हें दिलेली नव्हती, ही गोष्ट समजून घ्यावी. हे जाणून घेणे गरजेचे आहे की ही चिन्हें परमेश्वराच्या हातात आहेत. परमेश्वर कधीहि ती देऊ शकतात आणि कोणत्याहि वेळी ती थांबवू शकतात; ज्या ठिकाणी त्यांची इच्छा आहे, तेथे ती देऊ शकतात. बायबल (नवा करार) यांत कोठेहि असे वाचण्यात येत नाही की एखादयाला विष दिले असावे. येथे दिलेली काही चिन्हें, आध्यात्मिक दानाच्या यादीत आढळत नाहीत. आध्यात्मिक वरदाने – रोम 12:6-8; 1करिं अध्याय 12. नोट्स – पहा (यावरील) **19**

**16:19** लूक 24:50,57; प्रेषि 1:9-11; स्तो 110:1. "उजवीकडे" म्हणजे अधिकारांची, सन्मानाची, आदराची जागा/स्थळ. तुलना मत्त 28:18; फिली 2:9. **20**

**16:20** वचनें 17,18; इब्री 2:4.